महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:डीआरए-०५२१/प्र.क्र.१२५/२०२३/जाहिरात दिनांक: ११ सप्टेंबर, २०२३

**शुध्दीपत्रक :-**
**विषय : सहायक प्रारुपकार नि अवर सचिव, गट-अ**
**संदर्भ : जाहिरात क्रमांक - ०४१/२०२३, दिनांक १८ ऑगस्ट, २०२३**

शासनाच्या विधि व न्याय विभागाच्या नियंत्रणाखालील सहायक प्रारुपकार नि अवर सचिव, गट-अ या संवर्गांच्या एकूण ०३ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन आरक्षणासंदर्भात शासन पत्र, विधि व न्याय विभाग, क्रमांक इएसटी २०२३/प्र.क्र.४५/का.दोन, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार, पदांच्या आरक्षणामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

**भरावयाच्या पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा सुधारीत तपशील खालीलप्रमाणे आहे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ. ज. (ब) | भ. ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ | ०३ |
| सर्वसाधारण | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ | ०३ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |

२. वरीलप्रमाणे शासन अभिप्रायानुसार आरक्षणामध्ये बदल/सुधारणा झाल्यामुळे, अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०४१/२०२३ या जाहिरातीस अनुसरुन, प्रस्तुत शुध्दीपत्रकान्वये अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस, खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा अंतिम कालावधी** | **दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक** | **दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक** | **दिनांक १७ सप्टेंबर, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये** |

३. जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.
४. सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०४१/२०२३ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.